# ज.भ.शि.प्र.मंडळाचे,
# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
# शिवाजीनगर, गढी.

## बी.ए.व्दितीय वर्षे - पेपर - VIII
## विषय :- साहित्यकृतींचे माध्यमांतर

प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे (मराठी विभाग)

## साहित्य प्रकारांतर व साहित्याचे माध्यमांतर

साहित्यप्रकार हा साहित्यकृती आणि साहित्याचे विश्व यांना जोडणारा दुवा असतो. कोणताही साहित्यप्रकार हा आशय आणि तो व्यक्त करणारी संकेतव्यवस्था यांचा संच असतो. कोणत्याही साहित्यकृतीला साहित्यप्रकारांचा संदर्भ असतोच . लेखक जेव्हा एखादी साहित्यकृती साकार करतो,तेव्हा ती कुठल्यातरी एका साहित्यप्रकारामध्ये समाविष्ट होत असते. त्यामुळे एखादया साहित्य प्रकाराचे नाटयकलेत, चित्रपट, मालिकांमध्ये माध्यमांतर होणे हा आता काही नवीन प्रकार राहिलेला नाही. अशा माध्यमांतराव्दारे त्या साहित्यकृतीसही नवे परिमाण, नवा लुक आणि नव्या पिढीशी संवाद साधण्याचे माध्यम मिळालेले आहे.






प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे (मराठी विभाग)

## माध्यम : एक संकल्पना

माध्यमांतराची ही प्रक्रिया कलेच्या प्रांतातील एक महत्वपूर्ण अशी प्रक्रिया आहे. सर्वसाधारणत: माध्यम  म्हणजे जनसंपर्काचे एक साधन होय. किंवा अभिव्यक्तीचे एक साधन हा माध्यम  या शब्दाचा अर्थ व्यापक अर्थाने घेता येईल.मुद्रित प्रसारमाध्यमे, श्राव्य माध्यमे, दृकश्राव्य माध्यमे हा माध्यम या शब्दाचा अर्थ अभिप्रेत आहेच त्याशिवाय लोकरंजनाची पारंपरिक साधने ही अभिव्यक्तीची  माध्यमेच आहेत. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील कीर्तन, लळिते ,भारुड,तमाशा, श्रमगीते व जात्यावरील ओव्या ही साधने अभिव्यक्तीची माध्यमेच आहेत.


साहित्य व सिनेमाच्या अभ्यासकांसाठी
उपयुक्त ग्रंथ - कुंकू ते दुनियादारी...



प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे
(मराठी विभाग)

# प्रसारमाध्यमे : लेखनकौशल्य

भारतात मुद्रणकलेचा प्रारंभ 16 व्या शतकात झाला. पण तिला गती 18 व्या 19 व्या शतकात मिळाली.तत्कालीन समाजातील जनतेस प्रसारमाध्यमा विषयी उत्सुकता वाटत होती. पण आपले मत प्रकट व्हावे ही जाणिव त्यांच्या मनात निर्माण झालेली नव्हती. इंग्रजांचे भारतात आगमन आगमन झाल्यानंतर दळणवळणाची साधने ,कायदा व सुव्यवस्था, भौतिक संस्कृती इ.चा परिचय झ ाल्यामुळे भारतात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक,आर्थिक अशा सर्वांगीण दृष्टीने परिवर्तन होत गेले. लोकांच्या समग्र जीवनात आमूलाग्र परिवर्तन होऊ लागले. त्यातूनच मुद्रणकलेचा उगम झाला व वेगवेगळे प्रसारमध्यमे उदयाला आली.

1. वतृपत्रे
2. नभोवाणी
3. दूरदर्शन






प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे (मराठी विभाग)

## पटकथा

पटकथा ही चित्रपटाची दृश्यसंहिता असते. या लिखीत दृश्यसंहितेशिवाय चित्रपट बनणे केवळ अशक्य असते. चित्रपटाची मूळ कथा व तिची पटकथा यांचे असणारे स्थान अत्यंत महत्वाचे असते. चित्रपटाबरोबरच पटकथेचा ही उदय झालेला दिसतो. चित्रपट आधी कागदावर उभा राहतो व नंतर पडदयावर त्यामुळे पटकथेच्या लेखनाबाबत एक जागरुकता आलेली आहे.

## पटकथेचे वैशिष्टये

1. नाटयमयता 2.भावनिर्मिती 3.चित्रपटाचा आशय 4. पटकथा व नाटयसंहिता

5. कथा व पटकथा 6. पटकथा : नाटयमयता व दृश्यमयता





प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे (मराठी विभाग)

